समाजकार्य : **कार्यकर्ता पुरस्कार : प्रबोधन**

गजानन खातू



वयाचा आणि क्षमतेचा संबंध नाही, हा सार्वजनिक जीवनातील
एक आवडता सिद्धांत आहे; पण मी तो स्वीकारत नाही.
शरीराच्या क्षमतेप्रमाणे नवसर्जनाची क्षमताही कमी होते.
मुख्य म्हणजे बदलती परिस्थिती आणि नव्या पिढीबरोबर संवादी नाते
टिकविणे कठीण जाते. आरोग्यक्षेत्रातील सुधारणांमुळे जीवनमान वाढले,
याचा अर्थ नव्या जडणघडणीतील निर्णयप्रक्रियेत आपणच केंद्रस्थानी असायला हवे
असे नाही. नव्या पिढीवर विश्वास टाकून त्यांना सहकार्याची भूमिका घ्यायला हवी.
समाजाचे कुणाशिवाय अडत नाही याचा सतत अनुभव घेऊनही आपण ते स्वीकारत नाही.
नवी पिढी आपल्यापेक्षा अधिक सक्षम आहे, अधिक त्याग करायला तयार आहे
याचा मला रोज अनुभव येतो.

# पुढची पायरी चढण्याचा प्रयत्न

हिंद स्वराज्यवर आजही चर्चा होत राहतात आणि नव्या जगाच्या प्रश्नांशी त्याला जोडण्याचा प्रयत्न होतो; तेव्हा 'मी पूर्वी काय म्हणालो ते विसरा आणि आज काय म्हणतो ते लक्षात घ्या' असे सांगणाऱ्या आणि नित्यनूतन असणाऱ्या गांधीजींनाच नाकारतो आहोत का, असा प्रश्न पडतो. बदललेली परिस्थिती, बदललेली समाजस्थिती, बदललेले प्रश्न आणि नवी पिढी यांची दखल घेत आपण प्रश्नांचा मागोवा घेणार की नाही? पूर्वसुरींच्या कार्याची, विचारांची ओळख हवीच, त्यांच्यावर खांद्यावर आपण उभे आहोत याचे भानही हवे; पण पुढची पायरी चढण्याचा प्रयत्नही हवा, नाही तर समाजवास्तवापासून आपली फारकत होत जाईल.

महाराष्ट्र फाउंडेशनने दिलेल्या पुरस्काराबद्दल मला आनंद झाला, पण त्याच्याहून अधिक आनंद झाला तो माझा परिवार आणि तिन्ही पिढ्यांतील स्नेह्यांना झालेल्या आनंदाने.

आयुष्य मी पूर्णत्वाने आणि समाधानाने जगलो. तक्रार करण्यासारखे काही नाही. समाजाने अपेक्षेपेक्षा जास्त दिले. राष्ट्र सेवादल, अपना बजार आणि चळवळी, आंदोलने, समाजवादी पक्ष उभारणीचे प्रयत्न आणि शेवटच्या टप्प्यावर साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाची उभारणी– ही सगळी वाटचाल जेवढी अनपेक्षित, तेवढीच समृद्ध करणारी आहे. या सर्व काळात तरुणांसोबत काम करता आलं. आयुष्यात निरुद्देशी काळ कधी आलाच नाही. सेवादलाचे काम सोडून आणि अपना बजारमधून निवृत्त होऊन तीस वर्षांहून अधिक काळ झाला तरी मला आजही या दोन संस्थांच्या नावाने ओळखले जाते आणि दोन्ही संस्थांमधील कार्यकर्ते आपले मानतात, यापेक्षा आयुष्याची परिपूर्ती काय असू शकते?

समाजप्रबोधनासाठी मला पुरस्कार दिला आहे, त्यामध्ये माझ्या कार्यापेक्षा कार्यकर्त्यांचे प्रेम अधिक आहे याची मला जाणीव आहे. माझ्यासारख्या सर्वच काम करणाऱ्याला कशाबद्दल पुरस्कार द्यावा, असा प्रश्न पडू शकतो. वास्तविक पुरस्काराबद्दल माझी काही मते आहेत व त्याबद्दल मी लिहिले आहे. एक तर महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुरस्कार दिले जाऊनही– म्हणजे इतके कार्यकर्ते असूनही– प्रश्न मात्र बिकट होत आहेत; असे का? असा प्रश्न समाजाला पडू शकतो. परिणामी, पुरस्कारांची परिणामकारकता कमी होत आहे, याचा विचार सर्वच पुरस्कार देणाऱ्यांनी करणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे– पुरस्कार देताना वयाचा विचार व्हावा. शक्यतो तरुणांना द्यावेत, त्यांच्याकडूनच पुढील काळात अपेक्षा करता येतील. पूर्वायुष्यातील कामाची पोचपावती देण्याने देणाऱ्या-घेणाऱ्याला समाधान वाटले तरी समाजाच्या वाटचालीला फारसा उपयोग नाही. म्हणूनच सत्तरीनंतर पुरस्कार स्वीकारू नयेत, असे माझ्यापुरते ठरवले होते. परंतु नकार देणेही औचित्याचे ठरले नसते, आपुलकी अव्हेरण्यासारखे झाले असते; तेव्हा माझ्यासाठी हा शेवटचा पुरस्कार ठरावा.

प्रबोधनक्षेत्रात मी फार मोठे काम केले आहे असे नव्हे,

पण गेली चाळीस वर्षे मी लिहीत आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये ग्राहक प्रश्नावर कॉलम लिहिला, 'महानगर'मध्ये आर्थिक प्रश्नावर लिहिला आणि आता 'कलमनामा'मध्ये लिहितो आहे. त्यातून चार पुस्तकेही झाली. याशिवाय अनेक अंकांतून प्रसंगपरत्वे लिखाण होत आले. एवढे मात्र खरे, गेल्या काही वर्षांत विचारांना नक्की दिशा मिळाल्यासारखे वाटते आहे. त्यामुळे आर्थिक प्रश्न असो की सामाजिक विश्लेषण असो, मी माझी मते मांडतो आहे. महाराष्ट्रातील विचारविश्वाबद्दल एक तक्रार आहे. गांधी, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा समृद्ध वारसा आपल्याला मिळाला आहे; परंतु त्याच्यापुढे जायची आपली तयारी नाही. सगळी नवी मांडणी, नवे संशोधन याच कक्षात होत राहते आणि सर्व प्रश्नांची उत्तरे त्यातच शोधली जातात. हिंद स्वराज्यवर आजही चर्चा होत राहतात आणि नव्या जगाच्या प्रश्नांशी त्याला जोडण्याचा प्रयत्न होतो; तेव्हा 'मी पूर्वी काय म्हणालो ते विसरा आणि आज काय म्हणतो ते लक्षात घ्या' असे सांगणाऱ्या आणि नित्यनूतन असणाऱ्या गांधीजींनाच नाकारतो आहोत का, असा प्रश्न पडतो. बदललेली परिस्थिती, बदललेली समाजस्थिती, बदललेले प्रश्न आणि नवी पिढी यांची दखल घेत आपण प्रश्नांचा मागोवा घेणार की नाही? पूर्वसुरींच्या कार्याची, विचारांची ओळख हवीच, त्यांच्यावर खांद्यावर आपण उभे आहोत याचे भानही हवे; पण पुढची पायरी चढण्याचा प्रयत्नही हवा, नाही तर समाजवास्तवापासून आपली फारकत होत जाईल. सर्व मर्यादांची जाणीव ठेवून मी माझ्या परीने तसा प्रयत्न करीत आहे; पण माझ्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अभ्यासूंनी, विचारवंतांनी ते करायला हवे- तीच नव्या प्रबोधनाची दिशा असू शकेल.

वयाचा आणि क्षमतेचा संबंध नाही, हा सार्वजनिक जीवनातील एक आवडता सिद्धांत आहे; पण मी तो स्वीकारत नाही. शरीराच्या क्षमतेप्रमाणे नवसर्जनाची क्षमताही कमी होते. मुख्य म्हणजे बदलती परिस्थिती आणि नव्या पिढीबरोबर संवादी नाते टिकविणे कठीण जाते. आरोग्यक्षेत्रातील सुधारणांमुळे जीवनमान वाढले, याचा अर्थ नव्या जडणघडणीतील निर्णयप्रक्रियेत आपणच केंद्रस्थानी असायला हवे असे नाही. नव्या पिढीवर विश्वास टाकून त्यांना सहकार्याची भूमिका घ्यायला हवी. समाजाचे कुणाशिवाय अडत नाही याचा सतत अनुभव घेऊनही आपण ते स्वीकारत नाही. नवी पिढी आपल्यापेक्षा अधिक सक्षम आहे, अधिक त्याग करायला तयार आहे याचा मला रोज अनुभव येतो. देशातील अनेक आंदोलने, चळवळींचे नेतृत्व तरुण कार्यकर्ते करीत आहेत व त्याचा मला अभिमान आहे. म्हणून महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारामागे काही अपेक्षा असल्या तरी माझ्यापुरते कुठे थांबावे याची स्पष्टता आहे.

महाराष्ट्र फाउंडेशन आणि महाराष्ट्रातील सर्व स्नेही-सोबत्यांच्या आपुलकीबद्दल मी कृतज्ञ आहे.

**गजानन खातू**, मुंबई

ओळख
**गजानन खातू**

# पडद्याआड राहून सतत बरोबर असणारे

## सुरेखा दळवी

गजानन खातू हे नाव समाजवादी परिवाराबरोबरच सहकारक्षेत्र आणि पुरोगामी चळवळ यांना सुपरिचित असणारे नाव. एक अभ्यासू आणि कल्पक व निरलस व्यक्तिमत्त्व असणारे खातूभाई गेली ४०-४५ वर्षांहून अधिक काळ अनेक विधायक कामांशी जसे जोडलेले आहेत, तसेच सर्वसामान्य माणसाच्या जगण्याच्या मुद्यांवर चालू असणाऱ्या अनेक आंदोलनांशीदेखील. आणि हे सर्व करत असताना त्यांच्यातील सामाजिक, राजकीय विचाराचे भान कायम असणारा अभ्यासू कार्यकर्ता कायम जागा असतो; तसेच त्यांच्यातील कुटुंबवत्सल माणूसपणसुद्धा. म्हणूनच वयाच्या ७५ जवळ पोहोचणारे खातूभाई नव्या जुन्या सर्वच कार्यकर्त्यांत सहजपणे मिसळून जाताना दिसतात.

मूळचे कोकणातील असणाऱ्या खातूजींचे तरुणपण मुंबईतील गिरणगाव परिसरातील डोंगरी-कुंभारवाड्यात गेले. साहजिकच मध्य मुंबईची जडण-घडण त्यांनी जवळून पहिली, सामान्य माणसांची फरफटदेखील अनुभवली. आणि त्यामुळेच सामान्य माणसाच्या लढ्याशी त्यांचे नाते घट्ट राहिले आहे. वास्तविक आज सहकार, ग्राहक आणि आर्थिक विषयाचे ते एक नावाजलेले तज्ज्ञ आहेत. अनेक सहकारी व सामाजिक संस्थांचे सल्लागार आहेत. तरीही त्याचा वापर करून स्वत:साठी पैसा कमवावा, ऐषारामात जगावे, असे त्यांना कधी वाटले नाही. अतिशय साधे राहणीमान त्यांनी मनापासून स्वीकारलेले दिसते. त्यांचे लिखाणदेखील आघाडीच्या मासिके, वर्तमानपत्रे यांऐवजी रोजची मराठी दैनिके आणि त्यातही विचारपूर्वक निखिल वागळे, युवराज मोहिते यांसारख्या तरुणांनी नव्याने काढलेल्या वर्तमानपत्रांमध्ये केलेले दिसते.

राष्ट्र सेवादलाशी त्यांचा खूप जवळचा संबंध आहे. ते मुंबई विभागाचे अध्यक्ष असताना १९७१-७२ मध्ये तेव्हा अगदी जंगल असणाऱ्या मानखुर्दच्या कुमुद विद्यामंदिर परिसरात घेण्यात आलेला देशभरातील ५००० बाल-कुमारांचा आंतरभारती मेळावा म्हणजे सेवादल परिवारासाठी त्यांच्या संघटनकौशल्याचा एक लक्षात राहणारा अनुभव होता. त्या काळात ते सेवादलाचा आंतरराष्ट्रीय विभागदेखील वसंतराव नाचणे, मीना वैद्य, पांडुरंग कांबळी यांच्यासह सांभाळत होते.

नायगाव परिसरात मुंबई कामगार संस्थेच्या माध्यमातून मुंबईत सुरू झालेल्या 'अपना बजार' या पहिल्या डिपार्टमेंटल स्टोअरच्या उभारणीत आणि त्याला नावारूपाला आणण्यात त्याचे महाव्यवस्थापक म्हणून त्यांचा वाटा मोठा आहे.

रायगड जिल्ह्यात वडघर-माणगाव येथे उभ्या राहिलेल्या साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टशी त्यांचे नाव संकल्पना-मांडणीपासून ती अमलात आणणे याच्याशी जोडलेले आहे. साने गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांचे एक आगळे-वेगळे स्मारक उभारण्याची कल्पना- तीही हातात पैसा नसताना केवळ लोकांना -त्यातही शालेय मुलांना आणि शिक्षकांना आवाहन करून दाखविली. त्यातून पैसा उभा राहू शकतो आणि नवे तरुण कार्यकर्ते, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्ती यांचे योगदान मिळू शकेल, या विश्वासावर त्यांनी काही मोजक्या मित्रांसमोर एक स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षातही आणले. एवढेच नाही, तर एकदा संस्था काढली की ती पुढे चालवायला नवे कार्यकर्तेच मिळत नाहीत, अशी हाकाटी पिटणाऱ्यांना एक नवी परंपरा आखून दिली. ती म्हणजे, मरेपर्यंत पदाला चिटकून राहायचे नाही आणि त्यासाठी त्यांनी संस्थेच्या नियमात तरतूद करून टाकली आहे की, वयाच्या ६५ वर्षांनतर व्यक्ती कार्यकारी पदावरून मुक्त होईल. नव्या कार्यकर्त्यांना त्यामुळे संधी मिळू शकते, असे त्यांना वाटते. पदावर नावे सुचवितानादेखील तळागाळातून पुढे आलेले कार्यकर्ते त्यांच्या नजरेसमोर प्रथम येतात. येथे त्याचा संस्थेला उपयोग किती होईल यापेक्षा या पदावर आल्याने त्या कार्यकर्त्याचे समाजातील स्थान उंचावेल, हा दृष्टिकोन खातूभाईंकडेच असू शकतो.

विषमता निर्मूलन परिषद, सामाजिक कृतज्ञता निधी

अशांसारखे उपक्रम सुरू करण्यात व ते चालू ठेवण्यात आवश्यक ते सर्व सहकार्य त्यांचे राहिले आहेच. मुंबईत जेव्हा 'विश्व सामाजिक मंच'चे विश्वस्तरीय संमेलन झाले, त्यातही ते आखणीपासून मनापासून सहभागी झाले. सकारात्मक परिणामांची चर्चा ते करीत राहिले. जगभरातून चळवळीतील लोकांनी एकत्र येऊन एवढा मोठा इव्हेंट होत असताना तो आपण समजून घेतला पाहिजे, ही त्यांची भूमिका नंतर अण्णा हजारे यांच्या देशव्यापी भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाबाबतही राहिली. आपण चळवळीचे नेतृत्व करीत नसलो तरी वर्तमान घडामोडी, त्यातील तरुणाईचा प्रतिसाद हे समजून घ्यायचे असेल आणि तिला एक निश्चित दिशा द्यायची असेल; तर आपण त्यात आपला कार्यक्रम आणि कार्यपद्धती घेऊन सामील झाले पाहिजे, असे त्यांना वाटते. म्हणूनच मग अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या काळात ते आझाद मैदानात जात राहिले. तसेच भारतमाताजवळ गिरणी कामगार संघर्ष समितीसह अनेक पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते साथीला घेऊन अण्णा हजारेंनी सुरू केलेल्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाला जाहीर पाठिंबा घोषित करण्यासाठीच्या धरण्यात दिवसभर सहभागी होत, केवळ अशा आंदोलनाला एक दिवसाचा कार्यक्रम पुरेसा नाही तर ही प्रत्येकाच्या जीवनाला सर्व अंगांनी स्पर्श करणारी दीर्घ काळाची लढाई आहे- त्यात स्वत:ला आणि नेत्यांना दोघांना तपासणे आणि थेट भूमिका घेता आली पाहिजे याची जाणीवदेखील ते करून देत असत. अशा अनेक कार्यक्रमांतून नवे कार्यकर्ते घडत असतात व काही प्रमाणात लोकजागृती होत असते, असे म्हणून इतरांनीही यात सहभागी व्हावे, असे ते नेहमी सुचवत राहतात. त्यासाठी भेटेल त्याच्याशी बोलत राहतात. फोन करतात. त्यासंबंधी लिखाण करतात.

संगीत ऐकणे, निवडक नाटक-सिनेमा पाहणे, याबरोबरच कामाशिवाय फिरायला जाणे म्हणजे चैन नाही; तर बाहेर फिरून आल्यावर नव्या जोमाने काम करता येते, तसेच बाहेरचे जग समजून घेता येते असे म्हणत ते जवळच्या मित्रांसह वेळ काढून अशा कार्यक्रमांत सहभागी होतात. फिरायला जातानादेखील कुठे जायचे आणि काय पाहायचे, हे आधी ठरवतील. विवेकानंद स्मारक पाहिले तेव्हा आपल्याकडे वैचारिक व्यासपीठ बनू शकेल असे एखादे स्मारक असले पाहिजे, असे त्यांच्या मनात आले आणि मित्रपरिवाराच्या साथीने ते स्वप्न त्यांनी साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक व आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राच्या रूपाने मूर्त रूपात सर्वांसमोर ठेवले. आज या स्मारकात साने गुरुजींचा पुतळा नाही, पण नव्या पिढीत त्यांचे विचार पेरण्याचे काम सुरू आहे.

अनेक भाषा-संस्कृती असणाऱ्या राज्यात जेव्हा राजकीय स्वार्थातून मराठी विरुद्ध बिहारी असा संघर्ष सुरू करण्यात आला तेव्हा खातूभाई म्हणाले, "एकदा बिहारला जाऊन आले पाहिजे. कोणे एके काळी अतिशय प्रगत असणारा, मोठाली विद्यापीठे व शहरे असणारा हा परिसर मागे का पडला याचा शोध घेऊन ते लोकांसमोर आणले पाहिजे." आणि असे म्हणून तेथेच न थांबता ते बिहारला जाऊन आले आणि त्यांनी त्या अनुषंगाने एक लेख लिहिला. बाहेर गेल्याशिवाय, प्रत्यक्ष पहिल्याशिवाय परिसराचा-प्रश्नाचा फील येत नाही, असे त्यांचे म्हणणे असते. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक व आंतरभारती केंद्र सुरू केले, तेव्हापासून सर्व राज्यांचा सामाजिक-सांस्कृतिक वारसा व इतिहास, तेथील लोक, त्यांचे समाजजीवन आणि परिवर्तनाच्या चळवळी व लढे यांची माहिती इथे येणाऱ्या प्रत्येकाला मिळाली पाहिजे, असे स्वप्न घेऊन ते प्रत्यक्षात आणण्याची त्यांची धडपड सुरू आहे.

कोणत्याही प्रश्नाचे वास्तव मांडताना ते त्याच्या मुळाशी जाऊन आजच्या वर्तमानाशी कारणे व उपायांसह त्याचे संदर्भ जोडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. म्हणूनच कोकणातील बेरोजगारीचा, तेथील शेतीचा आणि विकासाचा वेध घेण्यासाठी त्यांनी संगमेश्वर हा एक तालुका घेऊन त्याचे सामाजिक-आर्थिक चित्र समोर मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसाच सध्या माणगाव तालुक्यातील शाळांची व शिक्षणाची स्थिती याचा अभ्यास ते करीत आहेत.

आर्थिक, सामाजिक आणि ग्राहकांच्या प्रश्नावर त्यांनी आपलं महानगर, कलमनामा इ. तून नियमित सदरे लिहिली आहेत. महाराष्ट्र टाइम्स, आंदोलन, साधना, पंचायत भारती यातही त्यांनी वेळोवेळी लिखाण केले आहे. त्यांचे लिखाण सोप्या भाषेत, जीवनाला स्पर्श करणाऱ्या विविध विषयांवर; तेही माहितीपूर्ण व चिंतनशील असे असते; तसेच एक निश्चित दिशा दाखविणारे, भूमिका घेणारे असते. या सर्व लेखमाला पुढे पुस्तकरूपाने वाचकांसाठी उपलब्ध आहेत. त्यांची प्रसिद्ध

झालेली पुस्तके– ‘जागतिकीकरण : परिणाम आणि पर्याय’ (२००१) व ‘जागतिकीकरणाचे दाहक वास्तव’ (२००४) ही दोन पुस्तके जागतिकीकरणाचा वेध घेणारी आहेत. नंतर २०११ मध्ये प्रसिद्ध झालेली ‘स्वप्नांच्या शोधात महाराष्ट्र’, ‘उत्तर आधुनिकतेचे आधुनिकतेला आव्हान’ ही दोन पुस्तके जागतिकीकरणाची प्रक्रिया एका अर्थाने पूर्णत्वाच्या टप्प्यावर पोचून त्याचे परिणाम प्रत्यक्षात दिसू लागल्यानंतरच्या काळातील बदलांचा वेध घेणारी आहेत. ही सर्व पुस्तके जागतिकीकरणाचे परिणाम आणि प्रक्रिया या विषयावर कार्यकर्त्यांचे अभ्यासवर्ग घेण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणारी आहेत. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर– प्रामुख्याने ज्या समूहांना जागतिकीकरणाचा फटका बसतो आहे त्यांचे प्रश्न मांडणे, हे त्यांच्या लेखाचे सूत्र आहे.

जागतिकीकरणाला विरोध किंवा समर्थन अशी टोकाची भूमिका न घेता मुळात ही प्रक्रिया समजून घेणे त्यांना महत्त्वाचे वाटते. म्हणूनच त्यांच्या लिखाणाचा केंद्रबिंदू हा या देशातील गरीब, कष्टकरी, शेतमजूर, असंघटित क्षेत्रातील कामगार, शहरी सामान्य मध्यमवर्ग, आदिवासी, मच्छीमार, गिरणी कामगार, झोपडपट्टीतील रहिवासी, चाळकरी आणि त्यांचे जगणे व राज्यकर्त्यांची त्यासंबंधीची धोरणे व निर्णय हे राहिले आहेत. २००० पूर्वीच लिहिलेल्या त्यांच्या काही लेखांची शीर्षकेच अशी आहेत– सागरपुत्र संकटात, आरोग्यसेवेची ऐशीतैशी, प्रश्न गरिबांच्या अन्न संरक्षणाचा, कामाच्या हक्कावर गदा, लघुउद्योगांची मरणयात्रा इ.

जागतिकीकरणाचा फटका बसलेला वर्ग आपले अस्तित्व टिकविण्यासाठी जे संघर्ष करीत आहे, त्या संघर्षाच्या चळवळीशी स्वत:ला जोडून घेतानादेखील त्यांच्यातील आर्थिक अभ्यासक सर्वांना बजावत असतो– जातिव्यवस्थेने समाजजीवन नियंत्रित करणारा गाव हा एकक विकास प्रक्रियेला चालना देण्यासाठी अपुरा आहे. तसेच केवळ शेतीचा विचार करून चालणार नाही, शेतीवरील अवलंबून असलेल्या वाढत्या लोकसंख्येचा वेगळा विचार केला पाहिजे. आपल्या अर्थव्यवस्थेत ग्रामीण गरिबाला आणि विशेषत: शोषित समाजाला गावकुसाबाहेर पडण्याची संधी देता आली पाहिजे. त्यासाठी एका बाजूला ग्रामीण समाजाचे उत्पन्न आणि जीवनमान वाढविणे, दुसरीकडे समाजाचे चलनवलन

आणीबाणीपूर्व काळातील जयप्रकाश नारायण यांचे नवनिर्माण आंदोलन,
मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, अशा आंदोलनांत ते सक्रिय होते. पुढे नर्मदा बचाव आंदोलन सुरू झाले तेव्हापासून मेधाची विकासाची मांडणी आणि त्यातून पुढे येणारे मुद्दे समजून घेत ते मुंबईतील आंदोलनाच्या सर्व कार्यक्रमांत सहभागी होते.
पुढे एन्रॉनविरोधी लढ्यात ते सक्रिय होते तसेच सेझ, दिल्ली–मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर, नॅशनल मॅन्युफक्चरिंग झोन, यांसारख्या महाकाय प्रकल्पांविरोधी लढ्यात ते अभ्यासपूर्ण मांडणी करीत आपले योगदान देत आहेत.

वाढविणे आणि तिसरीकडे नैसर्गिक साधनसंपत्तीचे हस्तांतरण रोखणे अशा पर्यायांचा शोध घ्यावा लागेल.

मध्यमवर्ग चंगळवादी जीवनशैलीकडे ओढला गेला असून सामाजिक चळवळीपासून अलिप्त होत आहे याची खंत ‘मध्यमवर्गाला झालंय तरी काय?’ अशी व्यक्त करून ते थांबत नाहीत; तर– धान्यापासून दारू कशाला? सेकंड होम कशाला? देशाला झालंय काय? मुंबईचे झाले काय? अशा प्रश्नांकित लेखांतून ते सामान्य नागरिकांच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करतात. सेझमागील सत्याचा शोध, महागाईच्या मुळाशी, मुलांचे आरोग्य आणि आभासी सुख अशा लेखांतून प्रश्नांची वस्तुनिष्ठ मांडणी करतात. सरकारी धोरणांची अभ्यासपूर्ण मांडणी करीत वास्तव चित्र त्यांच्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न करीत राहतात.

आणीबाणीपूर्व काळातील जयप्रकाश नारायण यांचे नवनिर्माण आंदोलन, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, अशा आंदोलनांत ते सक्रिय होते. पुढे नर्मदा बचाव आंदोलन सुरू झाले तेव्हापासून मेधाची विकासाची मांडणी आणि त्यातून पुढे येणारे मुद्दे समजून घेत ते मुंबईतील आंदोलनाच्या सर्व कार्यक्रमांत सहभागी होते.

पुढे एन्रॉनविरोधी लढ्यात ते सक्रिय होते तसेच सेझ, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर, नॅशनल मॅन्युफक्चरिंग झोन, यांसारख्या महाकाय प्रकल्पांविरोधी लढ्यात ते अभ्यासपूर्ण मांडणी करीत आपले योगदान देत आहेत. काय नको हे सांगत असताना का नको हेही पुराव्यानिशी मांडत पर्यायांची मांडणीदेखील ते करतात. म्हणूनच त्यांची मांडणी एक भूमिका घेणारी असली तरी एकांगी वाटत नाही. त्यांच्या सूचना कल्पक, नावीन्यपूर्ण असतात- तशाच वास्तवात येऊ शकतील अशा व्यवहार्यदेखील. आपल्या विचारांची ते मांडणी करतात तेव्हा त्यात इतिहासाचा धांडोळा असतो, वर्तमान परिस्थितीचे आकलन असते आणि त्यासाठी सामान्यजनांना सहज अनुसरता येतील अशा लहान-लहान कृतीदेखील ते सुचवीत असतात.

गिरणी कामगार संघर्ष समितीत दत्ता इस्वलकर आणि साथीदारांसोबत तर ते अगदी सुरुवातीपासून सक्रिय आहेत. या लढ्यात प्रत्येक टप्प्यावर ते चळवळीसोबत आहेत. गिरणी कामगारांचा रोजगार तर गेलाच; पण त्यांच्या मुलांचे भविष्य सुरक्षित व्हावे, म्हणून तरुणांसाठी रोजगाराच्या संधी आणि त्यासाठी क्षमताविकास यावरचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न ते करीत असतात.

तसेच जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, जागतिकीकरण-विरोधी कृती समिती, शहरी गरिबांचे निवाऱ्याचे प्रश्न, मंडया, चाळी, झोपडपट्टीवासीयांचे हक्क, नर्मदा बचाव आंदोलन, शोषित जन आंदोलन, असंघटित क्षेत्रातील कामगार, मंडलिक ट्रस्टचे पंचायतराज प्रशिक्षण आणि अन्याय- अत्याचार व भ्रष्टाचारविरोधी तसेच जात-जमातवादी शक्तींना विरोधाच्या कार्यक्रमांत ते कोणत्याही मानपानाची अथवा मानधनाची अपेक्षा न करता कायम साथीला असणार याची सर्वांना खात्री असते. एखादा आमंत्रित पाहुणा आला नाही, तर आयत्या वेळी मंचावर तुम्ही बसाल का- असे विचारले तरी त्यात कोणताही कमीपणा आहे असे न म्हणता अडचणीला खातूजी उभे राहतात, यातच त्यांचे मोठेपण आहे. पडद्यामागे उभे राहून जमेल ते सहकार्य करावयाचे आणि आपल्या ज्ञानाचा व स्थानाचा उपयोग चळवळी करणाऱ्या मंडळींना करून द्यायचा, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

लिखाण-वाचन, अभ्यासाबरोबर अतिशय कल्पक आणि नव्या आव्हानाला भिडण्याची, हाती घेतलेले काम होणारच या खात्रीसह स्वत: पडेल ते काम करण्याची त्यांची कायम तयारी असते. कुटुंब, मित्रपरिवारात रमणारे खातूभाई खरे समाजवादी आहेत. म्हणूनच स्वत:च्या घरात जेवण करण्यापासून आवरा-आवरीपर्यंत सर्व कामांत मीराताईंना सहभाग देतात. तसेच जिथे राहतील तिथे ते कुटुंबीय बनून सहजपणे मिसळून जातात. सार्वजनिक, कौटुंबिक कार्यक्रमांत पती-पत्नी दोघे जोडीने सहभागी होतात. आपली बायको-मुले आपण कार्यक्रमात बरोबर आणली, तरच आपल्या कामाशी आणि त्यामागील विचाराशी त्यांची ओळख होईल, असे म्हणून सर्वांसाठी सहकुटुंब एकत्र येण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम आखत असतात. आपली मुले-नातवंडे यांच्यात रमणारे खातूभाईंचे त्यांच्या सहकाऱ्यांशीदेखील तेवढ्याच जिव्हाळ्याने वागतात.

ज्यांच्याबद्दल फारसे लिहून आलेले नाही, असे अनेक वर्षे काम करणारे कार्यकर्ते यांच्याबद्दल लिहिले पाहिजे. चांगले आणि वेगळे काम करणारी, निष्ठेने काम करणारी माणसे प्रकाशझोतात आली पाहिजेत. नवीन तरुण कार्यकर्त्यांना शक्य ते बळ पुरविले पाहिजे. धडपडणाऱ्या कार्यकर्त्याला एखादी गाडी मिळवून देऊ या पासून एखादा कार्यकर्ता आजारी आहे कळले की, त्याच्यासाठी काही पैसे उभे करता येतील का याची खटपट खातूभाई कायम करणार. जुन्या कार्यकर्त्यांना देखील सांभाळून घेताना नव्यांची मानसिकता लक्षात घेत त्यांना कमीत कमी कष्ट व्हावेत व त्यांची ऊर्जा कामासाठी पूर्ण क्षमतेने वापरता यावी म्हणून पडद्याआड राहून काही तरी खटपट करताना दिसतात.

एकूणच, आपला विचार आणि जगणे यांत कोणताही विरोधाभास न ठेवता, तरीही कशाचा तोरा न मिरवता, व्यक्तिगत पातळीवर कुणाबद्दल कटुता न ठेवता सर्व घटना- प्रश्न यांकडे सकारात्मकतेने पाहत वस्तुनिष्ठ विश्लेषण करीत, तरीही आपली वैचारिक बांधिलकी जपत एक समृद्ध असे जीवन जगणारे आणि स्टेजवर असण्यापेक्षा पडद्याआड राहून परिवर्तनवादी चळवळीच्या सतत बरोबर असणारे खातूभाई हे कार्यकर्त्यांसाठी अखंड असा एक ऊर्जास्रोत आहेत.

**सुरेखा दळवी**
mob.: 9821140104.
surekhadalavi@yahoo.com